दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १४७ वा गुरूवार दि.२१ नोव्हेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## आ. रमेशआप्पा कराड यांनी मतदानाचा हक्क बजावला;





लातूर / प्रतिनिधी :- लातूर ग्रामीण विधानसभा निवडणुकीकरिता भाजपा व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांनी लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर या आपल्या गावी कुटुंबीयासमवेत मतदान करून लोकशाहीच्या उत्सवात सर्व मतदार बंधू भगिनींनी उत्स्फूर्तपणे मतदान करून लोकशाही मजबूत करावी असे आवाहन केले.

विधानसभा निवडणुकीची प्रचार धुमाळी संपल्यानंतर आज संपूर्ण राज्यात मतदान होत आहे. लातूर ग्रामीण विधानसभा निवडणुकीकरिता भाजपा महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांनी लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर येथील मतदान केंद्रावर जाऊन आपल्या मतदानाचा हक्क संपूर्ण कुटुंबीय समवेत बजावला. यावेळी त्यांनी सर्व मतदार बंधू भगिनींनी मतदान करून लोकशाही मजबूत करावी असे आवाहन केले.

यावेळी कराड कुटुंबातील माजी सरपंच मार्गदर्शक तुळशीरामअण्णा कराड, पिताश्री काशीराम नाना कराड, भाजपाचे नेते राजेशजी कराड, सुविद्यपत्नी सौ. संजीवनीताई कराड, भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा कराड, पृथ्वीराज कराड यांच्यासह संपूर्ण कराड कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

## बाभळगाव येथे धिरज देशमुख यांनी कुटुंबियांसह बजवला मतदानाचा हक्क













लातूरः-- महाराष्ट्रात काल सगळीकडे विधानसभेसाठी मतदान पार पडले आहे. लातूर तालुक्यातील बाभळगाव येथील मतदान केंद्रावर सहकार महर्षी,माजी मंत्री दिलीपराव देशमुख,लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख, श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख, सौ सुवर्णाताई दिलीपराव देशमुख, रितेश देशमुख, सौ. जेनेलिया रितेश देशमुख व सौ. दीपशिखा धिरज देशमुख यांनी मतदानाचा हक्क बजवला. लोकशाहीच्या हितासाठी व महाराष्ट्रातील जनतेच्या कल्याणासाठी सुरू असलेला मतदानाच्या उत्सवात सर्वांनी सहभागी होवून आपल्या नजीकच्या मतदान केंद्रावर जावून आपला मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन यावेळी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी मतदारांना केले.



## वंचितचे उमेदवार विनोद खटके यांनी सपत्नीक बजावला मतदानाचा हक्क



लातूर : वंचित बहुजन आघाडीचे अधीकृत उमेदवार विनोद सोमप्रकाश खटके यांनी आज २० नोव्हेंबर रोजी सपत्नीक मतदानाचा हक्क बजावला. विनोद खटके आणि त्यांच्या पत्नी सौ. दिक्षारांनी विनोद खटके यांनी बौद्ध नगर येथील मौलाना अब्दुल कलाम आझाद उर्दू शाळेतील मतदान केंद्रावर जाऊन मतदान केले. सर्व जनतेने या लोकशाहीचा उत्सवात आपला मतांचा अधिकार बजवावा, कोणीही मतदानापासून वंचित राहू नये, हे मतदान परिवर्तनासाठी आणि लातूर शहर विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीन विकासासाठी आहे. असे यावेळी त्यांनी आवाहन केले. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कुटुंबिय उपस्थित होते

## भाजपा महायुतीच्या उमेदवार डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांचे परिवारासह मतदान



लातूर/प्रतिनिधी: लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील भाजपा महायुतीच्या उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी परिवारासह मतदान केले.हे मतदान विकासासाठी व परिवर्तनासाठी असल्याची प्रतिक्रिया त्यांनी मतदानानंतर व्यक्त केली.

शहरातील आदर्श कॉलनीत कम्युनिटी हॉल येथील २२१ क्रमांकाच्या बुथवर त्यांनी मतदान केले.उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, त्यांचे पती शैलेश पाटील चाकूरकर,कन्या रुद्राली पाटील चाकूरकर व रुशिका पाटील चाकूरकर,माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर असा संपूर्ण परिवार एकत्रितपणे मतदानासाठी आला होता. सर्वांनी रांगेत उभे राहत मतदान केले.

मतदानानंतर माध्यमांशी संवाद साधताना उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर म्हणाल्या की,मतदानाला शहर मतदारसंघातील नागरिक उस्फूर्त प्रतिसाद देत आहेत. हे मतदान विकासासाठी व परिवर्तनासाठी होत असल्याचे त्या म्हणाल्या. माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांनी प्रत्येक नागरिकाने आपल्या पसंतीच्या उमेदवाराला मतदान करण्याचे आवाहन केले.

## लोकशाही मजबूत करण्यासाठी प्रत्येक मतदाराने मतदानाचा हक्क बजवावा अमित विलासराव देशमुख

लातूर /प्रतिनीधी :- महाराष्ट्र विधानसभा निवडणूक मतदान प्रक्रियेला आज बुधवार २० नोव्हेबर रोजी सुरुवात होताच लातुर शहर विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार माजी मंत्री अमित विलासराव देशमुख यांनी सौ. अदिती अमित देशमुख यांच्यासह बाभळगाव येथील बूथ क्रमांक ३७१ ग्राम सचिवालय बाभळगाव मतदान केंद्रात जाऊन बूथ मधील पहिले मतदान महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी केले. लोकशाही मजबूत करण्यासाठी प्रत्येक मतदाराने मतदानाचा हक्क बजावावा तसेच सशक्त महाराष्ट्र घडवण्यासाठी घराबाहेर पडून जास्तीत जास्त मतदान करावे, असे आवाहनही त्यांनी केले. आज महाराष्ट्र विधानसभा निवडणूक मतदान प्रक्रियेला बुधवार २० नोव्हेबर रोजी सुरुवात झाली आहे. लातुर शहर विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार माजी मंत्री अमित विलासराव देशमुख यांनी सौ. अदिती अमित देशमुख यांच्यासह बाभळगाव येथे मतदान केले. यानंतर बुथ क्रमांक ३७३ व ३७४ ला भेट देऊन मतदान किती झाले याची माहिती घेतली.





निलंगा विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे उमेदवार अभय साळुंके यांनी आपल्या कुटुंबासह पानचिंचोली येथील मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला

## संपादकीय....

# बाजी कोणाची?

विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या तोफा सोमवारी सायंकाळी थंडावल्या. गेले महिनाभर महायुती विरुद्ध महाआघाडी यांच्यातील आरोप-प्रत्यारोपांचे तुंबळ युद्ध महाराष्ट्रातील जनतेने अनुभवले आणि पाहिलेही. यंदाच्या निवडणुकीत कोण सत्तेवर येणार, कोण मुख्यमंत्री होणार, महाराष्ट्राचे नेतृत्व कोणाकडे सोपवायचे हा लाखमोलाचा प्रश्न आहे. पाच वर्षांपूर्वी मतदारांनी भाजपा-शिवसेना युतीला राज्यात सरकार स्थापन करण्याचा जनादेश दिला होता, पण मुख्यमंत्रीपदाचा मोह अविभाजित शिवसेनेच्या पक्षप्रमुखांना आवरला नाही. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने त्यांना त्यांच्या जाळ्यात अलगद ओढले. पक्षप्रमुखही मुख्यमंत्रीपदाच्या मखरात बसण्यासाठी अधीर झाले होते. ज्या शिवसेनाप्रमुखांनी आयुष्यभर काँग्रेस पक्षावर व गांधी घराण्यावर आपल्या लेखणीतून व वाणीतून फटकारे ओढले त्याच काँग्रेसबरोबर त्यांच्या पुत्राने सत्तेसाठी आघाडी केली. पक्षप्रमुखांनी भाजपाच्या पाठीत खंजीर तर खुपसलाच आणि राज्यातील मतदारांशी गद्दारी केली. मतदारांनी दिलेला जनादेश पक्षप्रमुखांनी काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसशी साटेलोटे करून धाब्यावर बसवला. म्हणूनच उद्या बुधवारी २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या मतदानाच्या निमित्ताने उबाठा सेनेला धडा शिकविण्याची उत्तम संधी मतदारांना लाभणार आहे.

गेल्यावेळी पक्षप्रमुखांनी शिवसेनाप्रमुखांचा पक्ष काँग्रेसच्या दावणीला बांधला, त्याचे उट्टे उद्याच्या मतदानात राज्यातील मतदार काढतील असा आम्हाला विश्वास आहे. महाराष्ट्राच्या चौफेर विकासासाठी राज्यात भाजपा-शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) या महायुतीची सत्ता स्थापन होणे गरजेचे आहे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना महाआघाडी सरकारने काय दिवे लावले हे राज्यातील जनतेने अनुभवले आहे. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अडीच वर्षांच्या सरकारमध्ये राज्याचा कसा गतिमान विकास झाला व सर्वसामान्य लोकांपर्यंत कल्याणकारी योजना कशा पोहोचल्या याचाही अनुभव जनतेला आला आहे. मुख्यमंत्री असताना आपण राज्याचे कुटुंबप्रमुख म्हणून कसे काम केले असे स्वतःच ठाकरे प्रचारसभातून सांगत असतात, खरे तर लोकांनी तसे म्हणायला हवे. मुख्यमंत्री असताना ठाकरे आपल्या घरातून किती वेळा बाहेर पडले व प्रशासनाचे मुख्यालय असलेल्या मंत्रालयात किती वेळा गेले हे त्यांनीच जाहीरपणे सांगावे. जो मुख्यमंत्री अडीच वर्षांत चार वेळाही मंत्रालयात गेला नाही, तो कार्यक्षम असू शकत नाही, प्रशासनाला गती देऊ शकत नाही, नोकरशहावर पकड निर्माण करू शकत नाही. फेसबुक लाईव्हवरून राज्यकारभार करता येत नाही. जो आपल्या आमदार-खासदारांना संभाळू शकत नाही, जो आपल्या पक्षाचे कार्यकर्ते व पदाधिकारी यांना मानसन्मान देऊ शकत नाही. तो पक्षप्रमुख किंवा मुख्यमंत्री म्हणून यशस्वी होणार तरी कसा? मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली ४० आमदारांनी बंडाचे निशाण फडकावले तेव्हा विधानसभेत विश्वासदर्शक ठरावालासुद्धा ठाकरे सामोरे गेले नव्हते, त्यांनी वर्षा बंगल्यावरून रातोरात मातोश्रीवर पळ काढला. हे मुंबईकरांनी स्वत: बघितले आहे व राज्यातील कोट्यवधी जनतेने टीव्हीच्या पडद्यावरून पाहिले आहे. मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देऊन मातोश्रीवर परतत असताना रस्त्यावर हजारो लोक उभे होते व त्यांना वाईट वाटले असा त्यांचा समज झाला.

प्रत्यक्षात बंड झाल्यावर लढायचे सोडून शिवसेनाप्रमुखांच्या पुत्राने घरी पळ का काढला हे बघायला लोक गर्दी करून रस्त्यावर जमले होते, हे त्यांना समजलेच नाही. असे घाबरणारे नेतृत्व असलेल्या पक्षाला मतदान तरी कोण करणार?

महाराष्ट्र हे देशातील प्रगतिशील व पुरोगामी राज्य आहे. देशाची आर्थिक राजधानी मुंबई ही या राज्याची राजधानी आहे. म्हणूनच भाजपा व महायुतीच्या दृष्टीने महाराष्ट्राची सत्ता पुन्हा मिळवणे महत्त्वाचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुंबई, खारघर, नवी मुंबई, छत्रपती संभाजी नगर, पुणे, सोलापूर, नांदेड, धुळे, नाशिक, चिमूर आदी ठिकाणी दहा प्रचारसभा घेतल्या. काँग्रेसमधील घराणेशाही व भ्रष्टाचार यावर त्यांनी चौफेर हल्ले केले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी, देशाचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आदी भाजपाच्या दिग्गजांच्या महायुतीसाठी प्रचारसभा झाल्या. राहुल गांधी, मल्लिकार्जुन खरगे, प्रियंका गांधी यांनी काँग्रेसच्या उमेदवारांसाठी सभा घेतल्या. ८४ वर्षांचे शरद पवार हे मोठ्या उमेदीने फिरताना दिसले. योगी आदित्यनाथ यांनी बटेंगे तो कटेंगे' अशा दिलेल्या घोषणाने महाआघाडीने थयथयाट केला. अजित पवारांनीही शाहू-फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्रात अशी घोषणा पसंत नसल्याचे म्हटल्याने महाआघाडीला भाजपावर टीका करायला आयते कोलीत मिळाले.

पंतप्रधानांनी एक है तो सेफ है', अशी घोषणा प्रत्येक सभेत केली. भाजपाने त्यांच्या जाहिराती अशा घोषणा करूनच केल्या. अशा घोषणांना किती प्रतिसाद मिळतो व अशा घोषणा महाराष्ट्रात किती प्रभावी ठरतात, ते मतदारच ठरवतील. महाआघाडीची अडीच वर्षांची कारकीर्द ही भ्रष्टाचाराने गाजली, तर महायुतीच्या कारकिर्दीत विकासकामांचीच जास्त चर्चा झाली. ठाकरे सरकार असताना १०० कोटींची खंडणी वसुली, कोरोना बाधित मृतदेह ठेवण्याच्या बॅगांमध्ये झालेला घोटाळा, रेमडेसिवीर इंजेक्शनचा भ्रष्टाचार, शेतकऱ्यांची कर्जमाफी घोषणेत झालेली फसवणूक, पालघर साधू हत्याकांडाची चौकशी बंद करण्याचा निघालेला आदेश, महापालिकेतील खिचडी घोटाळा अशी किती तरी उदाहरणे देता येतील. मेट्रो प्रकल्प, जलयुक्त शिवार, समृद्धी मार्ग, कोस्टल रोड, अटल सेतू, अशा किती योजनांमध्ये ठाकरे सरकारने खोडा घालण्याचा प्रयत्न केला होता. तत्कालीन केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना जेवताना भरल्या ताटावरून उठवून त्यांच्यावर पोलिसांनी कारवाई करावी म्हणून दबाव आणला गेला होता.

# सभा कोणाच्या फलदायी

लोकसभा निवडणुकीत मराठवाड्यात भाजपाला म्हणावी तशी साथ मतदारांकडून मिळाली नाही. त्यावेळची परिस्थिती व सध्याच्या विधानसभा निवडणुकीतील परिस्थिती खूप वेगळी आहे. त्यामुळे विधानसभेत मराठवाडा कोणाच्या बाजूने उभा राहील, यावर मराठवाड्यातील मतदारांची निष्ठाच राजकीय पक्ष तपासणार आहेत, असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अजित पवार यांनी देखील मराठवाड्यात विविध ठिकाणी सभा घेतल्या. महायुतीतर्फे घेतलेल्या जाहीर सभेत मराठवाड्यातील पाणीप्रश्न सोडविणार असल्याची ग्वाही अनेक नेत्यांनी दिली. मराठवाड्याच्या दृष्टीने ही खूप समाधानकारक बाब मानता येईल. देशाच्या पंतप्रधानांपासून राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांपर्यंत सर्वच नेत्यांनी मराठवाड्याच्या कळीच्या मुद्द्यावर हात घातला. येथील मतदारांना भावनिक साद घातली. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत विकासाच्या बाबी कमी; परंतु एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी जास्त झाडण्यात आल्या. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी पंतप्रधानांपासून उपमुख्यमंत्र्यांपर्यंत तसेच निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीतही अनेकदा खालच्या पातळीवरची टीका केली; परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दोन सभा मराठवाड्यासाठी फलदायी ठरतील असे चित्र दिसत आहे.

मराठवाड्यासाठीचा वॉटर ग्रीड प्रकल्प मार्गी लावल्याचे पंतप्रधानांनी जाहीर सभेत सांगितले. त्यापाठोपाठ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील या प्रकल्पामुळे मराठवाडा सुजलाम सुफलाम होईल, अशी ग्वाही दिली. मराठवाड्यातील पाणी प्रश्नासाठी २० हजार कोटी रुपयांची तरतूद केली जाणार आहे. वैतरणा आणि उल्हास खोऱ्यातून ५४.७० टीएमसी पाणी मिळणार असल्याचे सत्ताधाऱ्यांकडून सांगितले जात आहे. दुसरीकडे काँग्रेसचे राहुल गांधी तसेच अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी विकासात्मक मुद्द्यावर बोलण्याऐवजी केवळ सत्ताधारी व पंतप्रधानांवर टीका करण्यात मोठेपणा समजला. कर्नाटक व तेलंगणाप्रमाणे महाराष्ट्रातही महालक्ष्मी योजनेद्वारे महिलांना दर महिना ३००० रुपये देण्याची घोषणा काँग्रेसने केली. तसेच बेरोजगारांना नोकरी देण्याचे आश्वासनही दिले.

अडीच लाख तरुणांना रोजगार उपलब्ध करून देऊ, अशी ग्वाही काँग्रेसचे राहुल गांधी यांनी मराठवाड्यातील सभांमध्ये दिली. एकीकडे लोकसभा निवडणुकीत बसलेला फटका व झालेली पीछेहाट भरून काढण्यासाठी महायुती प्रयत्नशील आहे, तर लोकसभेमध्ये मतदारांनी महाविकास आघाडीला दिलेली पसंती यंदाच्या विधानसभा



निवडणुकीत कायम राहील का? याकडे राजकीय विश्लेषकांचे लक्ष आहे. मराठवाड्यातील मतदारांची निष्ठा कोणाकडे आहे, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. लोकसभा निवडणुकीच्या काळात मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून मनोज जरांगे यांनी मतदारांची मानसिकता वेगळीच बनविली होती; परंतु आता मराठवाड्यात तो फॅक्टर विधानसभा निवडणुकीपुरता तरी संपल्यात जमा आहे. त्यामुळे मतदार मतदान करत असताना लोकसभा निवडणुकीची मानसिकता ठेवणार नाही, असे चित्र दिसून येत आहे. विकासाच्या मुद्द्यावर तसेच उमेदवाराचा चेहरा पाहून यंदाची विधानसभा निवडणूक मराठवाड्यात तरी काम करेल, असे मानले जात आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर येथे मतदार कोणाच्या बाजूने उभे राहतील, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. या ठिकाणी हिंदू जिंकणार की मुस्लीम याबद्दल सर्वच मतदारांच्या मनात धाकधूक आहे.

छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, धाराशिव, लातूर या सर्वच जिल्ह्यात तुल्यबळ लढती होत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची छत्रपती संभाजीनगर येथे झालेली सभा मराठवाड्यासाठी विकासाची नांदी देणारी ठरली.पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लक्षवेधी सभा एमआयएमची हवा काढण्यासाठी पुरेशी ठरली. या ठिकाणी हिंदू विरुद्ध मुस्लीम असे वातावरण तापलेले आहे. याबरोबरच मराठवाड्यात एकनाथ शिंदे यांची शिवसेना की उद्धव ठाकरे यांची शिवसेना खरी आहे, याचाही निकाल मतदार देतील. छत्रपती संभाजी नगरात कोण वरचढ राहील? हे निकालानंतरच स्पष्ट होणार आहे. बीड, धाराशिव तसेच हिंगोली जिल्ह्यात मतदारांची पसंती भाजपाला राहणार की शरद पवारांसोबत? याकडे मराठवाड्याचे लक्ष लागले आहे. याबरोबरच उद्धव ठाकरे की एकनाथ शिंदे, कोणती शिवसेना जास्त मते घेईल हे देखील या निवडणुकीतून ठरणार आहे. मराठवाड्यात काँग्रेसची असलेली स्थितीही विधानसभेची निवडणूक अधोरेखित करणार आहे.

मराठवाड्यातील ४८ जागांवर २०१४ व २०१९ मध्ये भाजपाचे आमदार सर्वात जास्त होते. २०१४ मध्ये भाजपाचे मराठवाड्यात १५ आमदार होते, तर २०१९ मध्ये भाजपाचे १६ आमदार होते. त्या पाठोपाठ २०१४ मध्ये शिवसेनेचे ११ व नंतर २०१९ मध्ये शिवसेनेचे १२ आमदार होते. त्यानंतर काँग्रेसचे नऊ व आठ, राष्ट्रवादीचे आठ व पुन्हा २०१९ मध्ये आठ, एमआयएमचा २०१४ मध्ये एकमेव आमदार होता. त्यानंतर शेकाप, रासप या दोन्ही पक्षांचे एकेक आमदार २०१९ मध्ये मराठवाड्यातून निवडून आले. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मात्र ३५ विधानसभा मतदारसंघात महायुतीचे मताधिक्य घटले. यामागे विविध कारणे आहेत. असे असले तरी, मराठवाड्यातील सर्व पक्षातील तसेच अपक्षांचे, बंडखोरांचे भवितव्य २० नोव्हेंबर रोजी ठरणार आहे.

# का साजरा केला जातो जागतिक शौचालय दिवस?

## जाणून घ्या स्वच्छतेविषयी महत्वाचे नियम

जगभरात सगळीकडे १९ नोव्हेंबरला जागतिक शौचालय दिवस साजरा केला जातो. स्वच्छतेचे विशेष महत्व पटवून देण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. चला तर जाणून घेऊया जागतिक शौचालय दिवसाचा इतिहास आणि महत्व.




निरोगी जीवनशैली जगण्यासाठी पोटातील विषारी पदार्थ बाहेर पडून जाणे गरजेचे आहे. पण पोटातील विषारी पदार्थ बाहेर पडून गेले नाहीतर आरोग्यासंबंधित अनेक समस्या उद्भवण्याची शक्यता असते. त्यामुळे मानवाच्या मूलभूत गरजांपैकी एक महत्वाची गरज म्हणजे शौचालय. त्यामुळे जगभरात सगळीकडे जागतिक शौचालय दिवस साजरा केला जातो. या दिवशी आजारांपासून बचाव करण्यासाठी आणि स्वच्छतेच्या नियमांना प्रोत्साहन दिले जाते. उघड्यावर शौचास प्रतिबंध करण्यासारख्या विशेष मुद्यांवर भर द्याचे काम या दिवशी केले जाते. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला जगभरात जागतिक शौचालय दिवस का साजरा केला जातो? यंदाची थीम आणि जागतिक शौचालय दिवसाचा इतिहास, याबद्दल विशेष माहिती सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया.

जागतिक शौचालय दिवसाचा इतिहास:

२००१ मध्ये सिंगापूरमध्ये जॅक सिम यांनी जागतिक शौचालय दिवसाची सुरुवात केली होती. त्यानंतर १९ नोव्हेंबर पासून जगभरात सगळीकडे जागतिक शौचालय दिवस साजरा करण्यास सुरुवात झाली. स्वयंसेवी संस्थांनी शौचालयाचे महत्त्व अधोरेखित करण्याचे उद्दिष्ट ठेवत २००% मध्ये हा साजरा करण्यास सुरुवात झाली. तसेच हा दिवस साजरा करण्यासाठी शाश्वत स्वच्छता आघाडीकडून पाठिंबा देण्यात अलका होता. त्यानंतर संयुक्त राष्ट्रसंघाने पाण्याचा आणि स्वच्छतेचा हक्क हा मूलभूत मानवी हक्क म्हणून स्वीकारला आणि २०१० मध्ये जागतिक शौचालय दिवस साजरा करण्यास सुरुवात करण्यात आली.

जागतिक शौचालय दिवसाची यंदाची थीम:

शौचालय – शांततेचे ठिकाण, अशी जागतिक शौचालय दिवसाची २०२४ ची थीम ठरवण्यात आली आहे. सतत बदलत चालेले हवामान, नैसर्गिक आपत्तीमुळे सगळीकडे स्वच्छतेचा अभाव निर्माण झाला आहे. त्यामुळे यंदाच्या वर्षी स्वच्छतेवर विशेष भर देण्यात आला आहे. तसेच २०३० पर्यंत सर्वांसाठी सुरक्षित शौचालये आणि शाश्वत विकासाची ६ उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

लाईफ स्टाईलच्या बातम्यांसाठी इथे क्लिक करा

जागतिक शौचालय दिवसाचे उद्देश आणि का साजरा केला जातो हा दिवस:

जगभरात सगळीकडे जागतिक शौचालय दिवस १९ नोव्हेंबरला साजरा केला जातो. वाढती अस्वच्छता, हवामान बदल, आपत्ती आणि दुर्लक्ष इत्यादी अनेक कारणांमुळे सगळीकडे स्वच्छतेचा अभाव निर्माण झाला आहे. सगळीकडे अस्वच्छता निर्माण झाल्यामुळे मानवी जीवन धोक्यात आले. कचरा, घाणीमुळे अनेक गंभीर आजार पसरू लागतात. अपुरी शौचालय व्यवस्था, खराब तुटलेले शौचालय इत्यादी गोष्टींमुळे घाण वातावरणात पसरते आणि अनेक गंभीर आजार पसरतात. त्यामुळे जगभरातील प्रत्येक व्यक्तीकडे शौचालय असावे, यासाठी जागतिक शौचालय दिवस साजरा केला जातो.

# सकाळी लहान मुलांच्या नाश्त्यासाठी झटपट बनवा हेल्दी टेस्टी पालक पराठा, वाचा रेसिपी

लहान मुलांना हिरव्या पालेभाज्या खायला आवडत नाही., अशावेळी तुम्ही मुलांना या भाज्यांपासून पौष्टिक पालक पराठा बनवून देऊ शकता. पालक पराठा बनवण्यासाठी जास्त वेळ लागत नाही. चला तर जाणून घेऊया सोपी रेसिपी.

लहान मुलांना सकाळच्या नाश्त्यात नेमकं काय खायला द्यावं? असा प्रश्न सर्वच पालकांना पडतो. सर्वच घरांमध्ये मुलं नाश्त्यामध्ये बिस्कीट किंवा ब्रेड खातात. तसेच अनेकांना बाहेरून विकत आणलेले पदार्थ खायला खूप आवडतात. पण सतत बाहेरचे पदार्थ खाल्यामुळे पोट आणि पचनक्रिया बिघडण्याची शक्यता असते. त्यामुळे लहान मुलांना सतत बाहेरचे पदार्थ खायला देऊ नये. बाहेरचे पदार्थ खाऊन मुलं आजारी पडल्यानंतर मुलांच्या रोगप्रतिकारशक्तीवर त्याचा परिणाम दिसून येतो. त्यामुळे मुलांना नेहमी सकाळच्या नाश्त्यात किंवा इतर वेळी घरी बनवलेले पौष्टिक पदार्थ खाण्यास द्यावे. अशावेळी तुम्ही मुलांना नाश्त्यामध्ये पालक पराठे बनवून देऊ शकता. पालेभाज्या मुलांना खायला आवडत नाही. अशावेळी पराठे किंवा इतर पदार्थ तुम्ही मुलांना बनवून देऊ शकता. चला तर जाणून घेऊया पालक पराठा बनवण्याची सोपी रेसिपी.(फोटो सौजन्य-ळीींलज्ञ)

नवनवीन रेसिपीसाठी इथे क्लिक करा

साहित्य:

पालक जिरे
गव्हाचं पीठ
मीठ
गरम मसाला
आल्याचा तुकडा
बारीक चिरून घेतलेल्या हिरव्या मिरच्या
लसूण



नवनवीन रेसिपीसाठी इथे क्लिक करा

कृती:

पालक पराठा बनवण्यासाठी सर्वप्रथम, मिक्सरच्या भांड्यात स्वच्छ करून घेतलेला पालक, हिरव्या मिरच्या, लसूण टाकून बारीक वाटून घ्या.

त्यानंतर ताटात गव्हाचं पीठ घेऊन त्यात चवीनुसार मीठ टाकून मिक्स करून घ्या.

नंतर त्यात पालकचे तयार केलेले मिश्रण पिठामध्ये मिक्स करून घ्या.

नंतर त्यात आवश्यकतेनुसार पाणी टाकून पीठ मळून घ्या. नंतर पिठाला तेल लावून ५ ते १० मिनिटं बाजूला ठेवा.

तयार केलेल्या पिठाचे छोटे छोटे गोळे करून पराठे लाटून घ्या.

तव्यावर पराठे दोन्ही बाजूने भाजून घ्या. पराठे भाजून त्यावर तूप किंवा तेल लावा.

तयार आहेत पालकचे पराठे. हे पराठे तुम्ही लहान मुलांना डब्यात पण देऊ शकता.

# का साजरा केला जातो जागतिक शौचालय दिवस? जाणून घ्या स्वच्छतेविषयी महत्वाचे नियम

जगभरात सगळीकडे १९ नोव्हेंबरला जागतिक शौचालय दिवस साजरा केला जातो. स्वच्छतेचे विशेष महत्व पटवून देण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. चला तर जाणून घेऊया जागतिक शौचालय दिवसाचा इतिहास आणि महत्व.

निरोगी जीवनशैली जगण्यासाठी पोटातील विषारी पदार्थ बाहेर पडून जाणे गरजेचे आहे. पण पोटातील विषारी पदार्थ बाहेर पडून गेले नाहीतर आरोग्यासंबंधित अनेक समस्या उद्भवण्याची शक्यता असते. त्यामुळे मानवाच्या मूलभूत गरजांपैकी एक महत्वाची गरज म्हणजे शौचालय. त्यामुळे जगभरात सगळीकडे जागतिक शौचालय दिवस साजरा केला जातो. या दिवशी आजारांपासून बचाव करण्यासाठी आणि स्वच्छतेच्या नियमांना प्रोत्साहन दिले जाते. उघड्यावर शौचास प्रतिबंध करण्यासारख्या विशेष मुद्यांवर भर द्याचे काम या दिवशी केले जाते. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला जगभरात जागतिक शौचालय दिवस का साजरा केला जातो? यंदाची थीम आणि जागतिक शौचालय दिवसाचा इतिहास, याबद्दल विशेष माहिती सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया.

जागतिक शौचालय दिवसाचा इतिहास:

२००१ मध्ये सिंगापूरमध्ये जॅक सिम यांनी जागतिक शौचालय दिवसाची सुरुवात केली होती. त्यानंतर १९ नोव्हेंबर पासून जगभरात सगळीकडे जागतिक शौचालय दिवस साजरा करण्यास सुरुवात झाली. स्वयंसेवी संस्थांनी शौचालयाचे महत्त्व अधोरेखित करण्याचे उद्दिष्ट ठेवत २००७ मध्ये हा साजरा करण्यास सुरुवात झाली. तसेच हा दिवस साजरा करण्यासाठी शाश्वत स्वच्छता आघाडीकडून पाठिंबा देण्यात अलका होता. त्यानंतर संयुक्त राष्ट्रसंघाने पाण्याचा आणि स्वच्छतेचा हक्क हा मूलभूत मानवी हक्क म्हणून स्वीकारला आणि २०१० मध्ये जागतिक शौचालय दिवस साजरा करण्यास सुरुवात करण्यात आली.

जागतिक शौचालय दिवसाची यंदाची थीम:

शौचालय - शांततेचे ठिकाण, अशी जागतिक शौचालय दिवसाची २०२४ ची थीम ठरवण्यात आली आहे. सतत बदलत चालेले हवामान, नैसर्गिक आपत्तीमुळे सगळीकडे स्वच्छतेचा अभाव निर्माण झाला आहे. त्यामुळे यंदाच्या वर्षी स्वच्छतेवर विशेष भर देण्यात आला आहे. तसेच २०३० पर्यंत सर्वांसाठी सुरक्षित शौचालये आणि शाश्वत विकासाची ६ उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

जागतिक शौचालय दिवसाचे उद्देश आणि का साजरा केला जातो हा दिवस:

जगभरात सगळीकडे जागतिक शौचालय दिवस १९ नोव्हेंबरला साजरा केला जातो. वाढती अस्वच्छता, हवामान बदल, आपत्ती आणि दुर्लक्ष इत्यादी अनेक कारणांमुळे सगळीकडे स्वच्छतेचा अभाव निर्माण झाला आहे. सगळीकडे अस्वच्छता निर्माण झाल्यामुळे मानवी जीवन धोक्यात आले. कचरा, घाणीमुळे अनेक गंभीर आजार पसरू लागतात. अपुरी शौचालय व्यवस्था, खराब तुटलेले शौचालय इत्यादी गोष्टींमुळे घाण वातावरणात पसरते आणि अनेक गंभीर आजार पसरतात. त्यामुळे जगभरातील प्रत्येक व्यक्तीकडे शौचालय असावे, यासाठी जागतिक शौचालय दिवस साजरा केला जातो.

# 'संडे हो या मंडे', रोज खा अंडे, महिलांच्या स्मरणशक्तीत होईल सुधारणा, अभ्यासात खुलासा

दररोज अंडी खाल्ल्याने मेंदूचे कार्य सुधारू शकते, विशेषतः वयानुसार आणि पुरूषांच्या तुलनेत महिलांना याचा अधिक फायदा होतो असे अभ्यासात सिद्ध झाले आहे. अभ्यासात काय खुलासा करण्यात आला जाणून घ्या

तुम्हालाही वाढत्या वयाबरोबर तुमची स्मरणशक्ती टिकवून ठेवायची असेल, तर एक सोपा उपाय असू शकतो आणि तो म्हणजे अंडे. अलीकडेच, कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटी सॅन डिएगोच्या संशोधकांना एका अभ्यासात आढळून आले की, नियमितपणे अंडी खाल्ल्याने प्रौढांची स्मरणशक्ती सुधारण्याची शक्यता जास्त असते. विशेषतः, अंड्याचे सेवन स्त्रियांमध्ये संज्ञानात्मक कार्य सुधारण्यास मदत करू शकते असा खुलासा या अभ्यासात करण्यात आलाय.

अंड्यातील कोलीन, व्हिटॅमिन बी-६, बी-१२ आणि फॉलिक सिड यांसारखे पोषक तत्व मेंदूचे आरोग्य राखण्यास मदत करतात. संशोधकांच्या मते, अंडी केवळ मेंदूची कार्यक्षमता वाढवत नाहीत, तर महिलांच्या संज्ञानात्मक आरोग्यासाठी फायदेशीर आणि स्वस्त आणि सुलभ मार्ग देखील आहेत. जाणून घेऊया अधिक माहिती की अभ्यासात काय खुलासा करण्यता आलाय. (फोटो सौजन्य - ळडींलज्ञ)



अंड्याने वाढेल स्मरणशक्ती

अंडी खाण्याचा फायदे

युसी सॅन डिएगोने केलेल्या अभ्यासात ५५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या ८९० प्रौढांचा समावेश होता, त्यात ३५७ पुरुष आणि ५३३ महिलांचा समावेश होता. संशोधकांनी चार वर्षे या प्रौढांचे त्यांच्या संज्ञानात्मक कार्यावर अंड्याच्या सेवनाचा परिणाम तपासण्यासाठी निरीक्षण केले. परिणामांवरून असे दिसून आले की ज्या स्त्रियांनी जास्त अंडी खाल्ली त्यांच्या तोंडी शब्द योग्य आणि पटकन बोलण्याची क्षमता तुलनेने कमी होते. याव्यतिरिक्त, या महिलांमध्ये प्राणी, झाडे आणि इतर वस्तूंच्या श्रेणींची नावे ठेवण्याची क्षमतादेखील अधिक होती, तर ज्या महिलांनी कमी किंवा अंडी खाल्ली नाहीत त्यांच्यामध्ये ही क्षमता कमी दिसून आली.

उकडलेली अंडी साठवून ठेवण्याची योग्य पद्धत तुम्हाला माहिती आहे का? जाणून घ्या एका क्लिकवर

पुरूषांवर मात्र कमी प्रभाव

अंड्यामुळे महिलांना मिळतो फायदा

जरी अभ्यासात असे आढळून आले की अंड्यांच्या सेवनाने पुरुषांच्या संज्ञानात्मक कार्यावर कोणताही विशेष परिणाम होत नाही, परंतु संशोधकांनी स्पष्ट केले की अंड्याच्या सेवनामुळे कोणत्याही लिंगावर कोणताही हानिकारक प्रभाव पडत नाही. हा शोध महत्त्वाचा आहे, कारण वाढत्या वयानुसार मेंदूतील बदल आणि स्मरणशक्ती कमी होणे ही एक सामान्य समस्या बनली आहे, ज्याला लोक गांभीर्याने घेतात. तर महिलांमध्ये स्मरणशक्ती कमी होण्याचं प्रमाणही अधिक असल्याचे दिसून येते. त्यामुळे अंडी खाणे फायदेशीर ठरू शकते.

रोज अंडी खाण्याचे फायदे

संशोधकांनी असेही सांगितले की, अंडी केवळ मेंदूसाठीच फायदेशीर नसतात, तर महिलांच्या हाडांच्या आरोग्यासाठीही ते फायदेशीर ठरू शकतात. अंड्यांमध्ये उच्च दर्जाचे प्रथिने, व्हिटॅमिन बी १२, फॉस्फरस आणि सेलेनियमदेखील असतात, जे शरीराच्या विविध कार्यांमध्ये सुधारणा करण्यास मदत करतात. व्हिटॅमिन ए, बी१२ आणि सेलेनियम रोगप्रतिकारक शक्ती मजबूत ठेवण्यासाठी महत्वाचे आहेत.

एका दिवसात किती अंडी खावीत आणि अंडी खाण्याचे काय फायदे आहेत, जाणून घ्या

टीप - हा लेख केवळ सामान्य माहितीसाठी लिहिण्यात आला असून कोणत्याही प्रकारच्या उपचाराचा दावा यामध्ये करण्यात आलेला नाही. कोणताही उपाय करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि त्यांच्या सल्ल्यानुसारच योग्य बदलानुसार वापर करावा.

# जगभरात आंतरराष्ट्रीय पुरुष दिवस का साजरा केला जातो? काय आहे 'या' दिवसाचे विशेष महत्व

१९ नोव्हेंबरला जगभरात सगळीकडे आंतरराष्ट्रीय पुरुष दिवस साजरा केला जातो. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला आंतरराष्ट्रीय पुरुष दिवस का साजरा केला जातो? काय आहे या दिवसाचा इतिहास? याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत.

जगभरात सगळीकडे १९ नोव्हेंबरला आंतरराष्ट्रीय पुरुष दिवस साजरा केला जातो. समाजातील पुरुषांचे कौतुक करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. तसेच पुरुषांसमोर येणाऱ्या आव्हानांची जाणीव सगळ्यांना करून दिली जाते. सगळ्यांच्या जीवनात वडील, भाऊ, पती, मित्र किंवा शिक्षक इत्यादी महत्वपूर्ण भूमिका बजावतात. तसेच आयुष्यच्या प्रत्येक कठीण प्रसंगी खंबीर साथ देऊन संकटाना सामोरे जाण्यास प्रोत्सान देतात. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला जगभरात सगळीकडे आंतरराष्ट्रीय पुरुष दिवस का साजरा केला जातो? यंदाच्या वर्षीची थीम आणि आंतरराष्ट्रीय पुरुष दिवसच्या रंजक इतिहासाबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया.(फोटो सौजन्य- )

लाईफ स्टाईलच्या बातम्यांसाठी इथे क्लिक करा

आंतरराष्ट्रीय पुरुष दिवस का साजरा केला जातो?

जगभरातील सर्वच देशांमध्ये आंतरराष्ट्रीय पुरुष दिवस साजरा केला जातो. या दिवशी पुरुषांचे कौतुक केले जाते. शिवाय या खास दिवशी वेगवेगळ्या कार्यक्रमांचे अयोज़न केले जाते ज्यात पुरुष सहभागी होतात. कामाच्या धावपळीमध्ये पुरुषांना स्वतःसाठी वेळ देण्यास मिळत नाही. त्यामुळे या दिवशी कामाच्या धावपळीमधून थोडा वेळ काढत पुरुष कार्यक्रमांमध्ये सहभागी होतात. पुरुषांच्या आरोग्यावर लक्ष केंद्रित करणे, इतरांना मदत करणे इत्यादी सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. पुरुषांना अनेक प्रकारच्या आव्हानांना सामोरे जावे लागते, याची आठवण करून देण्याचा हा खास दिवस. समाजामध्ये पुरुषांना उद्भवणाऱ्या समस्या या दिवशी अधोरेखित केल्या जातात.




आंतरराष्ट्रीय पुरुष दिवसाचा इतिहास:

वेस्ट इंडिजचे प्राध्यापक डॉ. जेरोम टिळकसिंग यांनी १९९९ साली वडिलांचा वाढदिवस साजरा करण्यासाठी एका नवीन दिवसाची सुरुवात केली होती. त्यानंतर त्या दिवसाला आंतरराष्ट्रीय पुरुष दिवस असे नाव देण्यात आले. शिवाय पुरुषांच्या प्रश्नांवर प्रकाश टाकण्यासाठी हा दिवस साजरा करण्यात आला. त्यानंतर भारतामध्ये २००७ पासून आंतरराष्ट्रीय पुरुष दिवस साजरा करण्यास सुरुवात झाली. या दिवशी पुरुषांच्या आरोग्याबद्दल जागरूकता पसरवली जाते.

आंतरराष्ट्रीय पुरुष दिवसाची यंदाची थीम:

दरवर्षी आंतरराष्ट्रीय पुरुष दिवस साजरा करताना वेगवेगळ्या मुद्यांवर लक्ष केंद्रित केले जाते. त्यामुळे २०२४ ची थीम मेन्स हेल्थ चॅम्पियन अशी ठेवण्यात आली आहे. पुरुषांचे आरोग्य सुधारणे हा या मागचा विशेष हेतू आहे.

आंतरराष्ट्रीय पुरुष दिवसाच्या खास शुभेच्छा:

कुटुंबाच्या चेहऱ्यावर हास्य आणण्यासाठी
सर्वकाही त्याग करणे
आणि नेहमी सर्वांसाठी उभे राहिल्याबद्दल धन्यवाद!
जागतिक पुरुष दिवसाच्या शुभेच्छा

माणसाला दु:ख जाणवत नाही ही म्हण खरी मानून,
जो वयामुळे आपल्या वेदना लपवतो तोही माणूस असतो,
त्यालाही वेदना होतात पुरुष दिनाच्या शुभेच्छा!

तुमच्या जीवनातील प्रत्येक दिवस आनंद घेऊन येवो
पुरुषांना आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाच्या शुभेच्छा!
तुम्ही सदैव आनंदी राहा, निरोगी राहा, निरोगी राहा.

तुझी सर्व स्वप्ने पूर्ण होवोत,
तुम्ही नेहमी पुढे जात रहा.
पुरुष दिनाच्या शुभेच्छा

## दिव्यांगकक्षाने उपलब्ध केलेल्या सुविधांच्या सहायाने किनवटमध्ये दिव्यांगांनी केले मतदान

किनवट/शेख शौकत :-८३- किनवट विधानसभा मतदार संघातील किनवट शहरातील नगर परिषद नवी इमारत येथे असलेल्या मतदान केंद्र क्रमांक १८३ येथे व्हीलचेअरच्या सहाय्याने दिव्यांग महिला मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

सहायक जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी कावली मेघना (भाप्रसे) यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांग कक्षाचे नोडल प्राचार्य डॉ. आनंद भंडारे, प्रा. डॉ. एस. के.बेंबरेकर, सहाय्यक अधिकारी प्रा. डॉ. सुनील व्यवहारे, सहाय्यक तलाठी दयानंद येरडलावार, अयोध्या जटाळे, शिपाई गोविंद तगडपेल्लीवार, मिलिंद लोकडे यांनी एन.सी. सी., एन.एस.एस. व स्काऊट गाईड या स्वयंसेवकांच्या सहाय्याने दिव्यांग मतदारांना विविध सुविधा पुरविल्या आहेत.




## मध्य नागपुरात राडा, काँग्रेस कार्यकर्त्यांचा ईव्हीएम असलेल्या कारवरच हल्ला

नागपूर : दिवसभर काही ना काही कारणाने तणावात असलेल्या नागपूर मध्य मतदारसंघात रात्री साडेसात वाजण्याच्या सुमारास चक्क अतिरिक्त ईव्हीएम मशीन असलेल्या निवडणूक आयोगाच्या कारवरच काही तरुणांनी हल्ला केला.

संबंधित कारची तोडफोड करण्यात आली. यामुळे परिसरात तणाव निर्माण झाला होता. पोलिस विभागाकडून हल्ला करणारे तरुण काँग्रेस कार्यकर्ते होते व गैरसमजातून हा प्रकार घडल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

नागपूर मध्यमधील किल्ला परिसरातील बूथ क्रमांक २५८ च्या परिसरात सायंकाळी सात ते साडेसात दरम्यान ही घटना घडली. स्ट्राँगरूममध्ये ईव्हीएम घेऊन जाणारी एमएच ३१ सीपी ३२२९ ही गाडी मतदान केंद्राच्या बाहेर निघाली. त्यावेळी अचानक काही काँग्रेस कार्यकर्त्यांनी ती गाडी थांबविली. त्यांनी शिवीगाळ करीत त्यावर हल्ला केला व तोडफोड केली. त्याचवेळी एमएच १९ बीयू ६०२७ ही गाडीदेखील निघाली. त्यात बसलेल्या कर्मचाऱ्यावरदेखील हल्ला करण्यात आला. तरुणांनी दगड व लोखंडी रॉड्सने कारची तोडफोड करण्याचा प्रयत्न केला. तातडीने पोलिस पथक घटनास्थळी पोहोचले व कर्मचाऱ्यांना सुरक्षित जागेवर नेले. तोडफोड करण्यात आलेली गाडी कोतवाली पोलिस ठाण्यात नेण्यात आली, तर ईव्हीएमला दुसऱ्या वाहनातून रवाना करण्यात आले. ही बातमी पसरताच भाजप व काँग्रेस कार्यकर्ते जमा झाले. मात्र, पोलिसांनी सर्वांना तेथून पिटाळून लावले. यावेळी भाजपचे नागपूर मध्यमधील उमेदवार प्रवीण दटके हेदेखील आक्रमक झाले होते व पोलिसांनी कठोर कारवाईची मागणी त्यांनी केली.

बंटी शेळकेंनी भाजप कार्यकर्त्यावर हल्ला केल्याचा आरोप

दरम्यान, भाजप-काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये यानंतर मोठा राडा झाला. बंटी शेळके व त्यांच्या कार्यकर्त्यांनी भाजप कार्यकर्त्यावर हल्ला केल्याचा आरोप भाजप पदाधिकाऱ्यांनी केला. त्यामुळे शेळके यांच्याविरोधात तक्रार करण्यासाठी भाजपचे पदाधिकारी कोतवाली पोलिस ठाण्यात पोहोचले होते. याबाबत पोलिस अधिकाऱ्यांनी काहीही बोलण्यास नकार दिला आहे. या घटनेमुळे या परिसरात वाहतुकीची मोठी कोंडीदेखील निर्माण झाली होती.

गैरसमजातून झाला नागपूर मध्यमधील गोंधळ

दरम्यान, नागपूर मध्यमधील राडा हा गैरसमजातून झाल्याचे पोलिस विभागाकडून सांगण्यात आले आहे. निवडणूक प्रक्रियेतील झोनल अधिकारी एक डॉक्युमेंट प्रिंट करण्यासाठी झेरॉक्स केंद्रावर गेला होता. त्यांच्याजवळ त्यावेळी अतिरिक्त ईव्हीएम मशीनदेखील होत्या. काँग्रेसच्या काही कार्यकर्त्यांच्या हे नजरेस पडले व त्यांनी ते ईव्हीएम मशीन स्वत:सोबत का नेत आहेत, असा सवाल उपस्थित करीत आक्रमक पवित्रा घेतला. यामुळे गैरसमज आणखी वाढला व त्यातूनच संतप्त कार्यकर्त्यांनी वाहनाची तोडफोड केली. यानंतर भाजप-काँग्रेसचे कार्यकर्ते पोलिस ठाण्यासमोर आमनेसामने आले. संबंधित झोनल अधिकारी मतदान केंद्रावर परतले असून, पॅकिंगची बाकी प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

## लातूर जिल्ह्यात शांततामय वातावरणात, उत्स्फुर्तपणे मतदान; मतदान केंद्रांवरील सुविधांबद्दल मतदारांनी व्यक्त केले समाधान





लातूर, दि. २० : विधानसभा निवडणुकीसाठी लातूर जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघात आज उत्साहपूर्ण आणि शांततामय वातावरणात मतदान झाले. सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुमारे ६१.४३ टक्के मतदारांनी आपला हक्क बजाविला. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी विविध मतदान केंद्रांना भेटी देवून तेथील मतदान प्रक्रियेची पाहणी केली. तसेच सामान्य निवडणूक निरीक्षक डॉ. करुणा कुमारी, लक्ष्मीकांत प्यारेलाल प्रधान, साकेत मालवीया, पोलीस निवडणूक निरीक्षक प्रमोद कुमार मंडल यांनीही जिल्ह्यातील विविध मतदान केंद्रांना भेटी दिल्या.

लातूर जिल्ह्यातील सर्व २ हजार १४३ मतदान केंद्रांवर सकाळी ७ वाजताच मतदानाला सुरुवात झाली. अनेक मतदान केंद्रांवर सकाळी ७ पासूनच मतदारांनी गर्दी करण्यास सुरुवात केली. ग्रामीण भागासह शहरी भागातील अनेक मतदान केंद्रांवर सकाळीच मतदारांच्या रांगा लागल्याचे चित्र दिसून आले. जिल्हा निवडणूक यंत्रणेमार्फत सर्व मतदान केंद्रांवर व्हीलचेअर, पिण्याचे पाणी, प्रथमोपचार पेटी, प्रतिक्षा कक्ष किमान आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. तसेच मतदान केंद्राबाहेर सावलीसाठी मंडप उभारण्यात आला होता.

जिल्ह्यातील १ हजार २२७ मतदान केंद्रावरील मतदान प्रक्रियेचे वेब कास्टिंग करण्यात आले. याद्वारे जिल्हाधिकारी कार्यालयात तयार करण्यात आलेल्या नियंत्रण कक्षातून मतदान प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यात येत होते. जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सकाळी मतदान प्रक्रिया सुरु झाल्यानंतर या कक्षाला भेट देवून मतदान केंद्रांवर सुरु असलेल्या कामकाजाची पाहणी केली. तसेच मतदान केंद्रावर नियुक्त मतदान पथकांना दूरध्वनीद्वारे सूचना दिल्या. उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, वेबकास्टिंगचे सहायक नोडल अधिकारी नितीन आगावणे यावेळी उपस्थित होते.

यानंतर जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे आणि पोलीस अधीक्षक श्री. मुंडे यांनी लातूर शहर मतदारसंघातील मतदान केंद्रांना भेटी दिल्या. याठिकाणी आलेल्या मतदारांशी त्यांनी संवाद साधला. तसेच मतदान केंद्रांवर उपलब्ध करून देण्यात आलेल्या सुविधांबाबत त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. मतदानाचा हक्क बजाविलेल्या मतदारांचे त्यांनी यावेळी अभिनंदन केले. दुपारच्या वेळी काही काळ मतदान केंद्रावरील रांगा कमी झाल्यानंतर सायंकाळच्या सत्रात ग्रामीण व शहरी भागातील मतदान केंद्रांवरही मोठी गर्दी दिसून आली.

मतदान केंद्रावरील सुविधांबाबत दिव्यांग मतदारांनी व्यक्त केले समाधान

दिव्यांग मतदारांसाठी भारत निवडणूक आयोगाने व्हीलचेअर, घरापासून ते मतदान केंद्रापर्यंत मोफत वाहन व्यवस्था आदी सुविधा उपलब्ध करून दिली होती. तसेच दृष्टी दिव्यांगत्व असलेल्या मतदारांसाठी ब्रेललिपीतून उमेदवारांची माहिती देण्यात आली होती. त्यामुळे इतर कोणाचीही मदत न घेता त्यांना मतदान करणे शक्य झाले. दिव्यांग मतदारांना देण्यात आलेल्या या सुविधांबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले, तसेच भारत निवडणूक आयोगाचे आभार मानले. दिव्यांग मतदारांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नियुक्त नोडल अधिकारी तथा समाज कल्याण सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोष नाईकवाडी यांनीही प्रत्यक्ष मतदान केंद्रांवर उपस्थित राहून मतदारांना सहाय्य केले. तसेच जिल्ह्यातील सर्व दिव्यांग मतदारांना सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत समन्वय केला.

गरोदर महिला, वयोवृद्ध मतदारांना मिळाला प्राधान्याने प्रवेश

मतदारांना आपला अधिकारी बाजाविणे सोयीचे व्हावे, यासाठी जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार किमान आवश्यक सुविधा पुरविण्यात आल्या होत्या. यासोबतच मतदान केंद्रांवर येणाऱ्या गरोदर महिला, वयोवृद्ध मतदारांना रांगेत उभे न करता प्राधान्याने थेट प्रवेश देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या होत्या. यामुळे त्यांना मतदान केंद्रावर प्रतिक्षा करावी लागली नाही. जिल्हा निवडणूक यंत्रणेने गरोदर महिला, वयोवृद्ध मतदारांची काळजी घेतल्यामुळे त्यांनी समाधान व्यक्त केले.

लोकशाहीच्या उत्सवात नवमतदारांसह ज्येष्ठांचाही उत्स्फूर्त सहभाग

जिल्ह्यातील प्रत्येक मतदाराला आपला हक्क बजाविता यावा, यासाठी जिल्हा निवडणूक यंत्रणेकडून आवश्यक सज्जता करण्यात आली होती. 'स्वीप' उपक्रमांतर्गत युवकांसाठी कॉफी विथ कलेक्टर, महिलांसाठी संवाद कार्यक्रम यासह अभिनव उपक्रम राबविण्यात आले. या माध्यमातून मतदारांना लोकशाहीच्या सर्वात मोठ्या उत्सवात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले होते. मतदानाला सुरुवात झाल्यानंतर नवमतदारांसह ज्येष्ठ मतदारही मोठ्या संख्येने मतदानासाठी बाहेर पडल्याचे दिसून आले. तसेच दुपारपासून महिला मतदारांचीही मोठ्या गर्दी वाढली. मतदार यादीत नाव नोंदविल्यानंतर पहिल्यांदाच मतदानाचा हक्क बजाविण्याची संधी मिळालेल्या मतदारांचा उत्साह यावेळी त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता.

सायंकाळी ५ वाजेपर्यंतच्या मतदानात महिलांचा टक्का अधिक

लातूर जिल्ह्यात सायंकाळी ५ पर्यंत सुमारे ६१.४३ टक्के मतदान झाले. यामध्ये सुमारे ६०.२६ टक्के पुरुष आणि ६२.७० टक्के महिलांनी आपला अधिकार बजाविल्याचे दिसून आले. सायंकाळी ५ वाजेपर्यंत लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात सुमारे ६४.७५ टक्के मतदान झाले. लातूर शहर विधानसभा मतदारसंघात सुमारे ५८.२७ टक्के, अहमदपूर विधानसभा मतदारसंघात सुमारे ६०.२७ टक्के, उदगीर (अ.जा.) विधानसभा मतदारसंघात सुमारे ६२.४३ टक्के, निलंगा विधानसभा मतदारसंघात सुमारे ६१.७५ टक्के आणि औसा विधानसभा मतदारसंघात सुमारे ६१.८२ टक्के मतदान झाले. सायंकाळी ६ पर्यंत जिल्ह्यातील अनेक मतदान केंद्रावर नागरिकांच्या रांगा लागल्या होत्या.

### मतदान आटोपल्यावर फडणवीस पोहोचले संघ मुख्यालयात; सरसंघचालकांशी २० मिनिटे चर्चा



नागपूर : विधानसभा निवडणूकीचे मतदान आटोपल्यानंतर सायंकाळच्या सुमारास उपमुख्यमंत्री व दक्षिण-पश्चिम नागपुरचे भाजपचे उमेदवार देवेंद्र फडणीस यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयाला भेट दिली.

यावेळी त्यांनी केवळ मतदानासाठी नागपुरात आलेले सरसंघचालक डॉ.मोहन भागवत व माजी सरकार्यवाह भैय्याजी जोशी यांच्याशी सुमारे २० मिनिटे चर्चा केली. निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर ही भेट झाल्याने विविध कयास लावण्यात येत आहेत.

फडणवीस हे सायंकाळी ६.२० मिनिटांच्या सुमारास महालातील संघ मुख्यालयात पोहोचले. सरसंघचालक उत्तरांचलहून केवळ मतदानासाठी नागपुरात पोहोचले होते. फडणवीस यांनी त्यांच्यासोबत भैय्याजी जोशी यांच्याशी चर्चा केली. सद्यस्थितीतील राजकीय चित्र, २३ नोव्हेंबरनंतरची राजकीय समीकरणे इत्यादींवर यात चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. सुमारे २५ मिनिटांनंतर फडणवीस तेथून रवाना झाले.

या भेटीत नेमकी काय चर्चा झाली याची कुठलीही अधिकृत माहिती संघाकडून देण्यात आलेली नाही. बुधवारी दिवसभर फडणवीस नागपुरातील विविध मतदान केंद्रांजवळील भाजपच्या बुथवरदेखील पोहोचले होते. यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. अचानक सायंकाळी ही भेट झाल्याने राजकीय वर्तुळाच चर्चांना उधाण आले आहे.

## शिंदे, ठाकरे, फडणवीस की पवार..; मुख्यमंत्रिपदासाठी पहिली पसंती कोणाला?



महाराष्ट्रातील सर्व २८८ विधानसभा जागांवर मतदान संपल्यानंतर आता सर्वांच्या नजरा २३ नोव्हेंबर रोजी येणाऱ्या निकालांवर लागल्या आहेत. दरम्यान, आज मतदान संपल्यानंतर एक्झिट पोलची आकडेवारी समोर आली, ज्यात महायुतीला स्पष्ट बहूमत मिळण्याचा अंदाज व्यक्त केला जातोय.

अशातच, राज्याचा पुढील मुख्यमंत्री कोण होणार, असाही प्रश्न सर्वांच्या मनात आहे. महायुती आणि महाविकास आघाडीने मुख्यमंत्रिपदाचा निर्णय निवडणुकीनंतर घेतला जाईल, असे जाहीर केले होते. पण, एका एक्झिट पोलनुसार, सर्वाधिक पसंतीचे मुख्यमंत्री कोण? हे समोर आले आहे.

पीपल्स पल्सच्या एक्झिट पोलच्या आकडेवारीनुसार, ३५.८ टक्के लोकांनी विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना त्यांची पहिली पसंती दिली आहे. दुसऱ्या क्रमांकावर उद्धव ठाकरे आहेत. त्यांना २१.७ टक्के लोकांनी पसंती दिली आहे. तर, देवेंद्र फडणवीस यांना फक्त ११.७ टक्के लोकांची पसंती आहे. याशिवाय, अजित पवार यांना २.३ टक्के आणि नाना पटोले यांना १.३ टक्के लोकांनी पसंती दिली आहे. तर, इतरांना २७.२ टक्के लोकांनी पसंती दिली.

महाराष्ट्रात महायुतीचे सरकार

महाराष्ट्रात एनडीएला प्रचंड बहुमत मिळेल, असा अंदाज चरीॐश एक्झिट पोलने वर्तवला आहे. या एक्झिट पोलमध्ये महायुतीला १५०-१७० जागा मिळतील, तर काँग्रेस आघाडीला ११०-१३० जागा मिळतील असा अंदाज आहे. महाराष्ट्रात २८८ जागा आहेत. २३ नोव्हेंबरला निकाल लागणार आहे.

झच-ठट च्या एक्झिट पोलमध्ये महाराष्ट्रातही महायुतीचे सरकार येणार असल्याचे सांगितले जात आहे. झच-ठट च्या एक्झिट पोलमध्ये महायुतीला १३७-१५७, महाविकास आघाडीला १२६-१४६ आणि इतरांना २-८ जागा मिळण्याची शक्यता आहे.

तर, चाणक्य स्ट्रॅटेजीजच्या एक्झिट पोलमध्येही महायुतीला बहुमत मिळणार असल्याचे सांगितले आहे. एक्झिट पोलनुसार, महायुतीला १५२-१६० जागा मिळतील, तर काँग्रेस आघाडीला १३०-१३८ जागा मिळतील असा अंदाज आहे.

## दु:खाचा डोंगर बाजूला सारून बजावला हक्क; आजीच्या अंत्यविधीनंतर संपूर्ण कुटुंब मतदान केंद्रावर

परळी वैजनाथ (बीड) : विधानसभा निवडणुकीची मतदान प्रक्रिया सुरू आहे. खऱ्या अर्थाने हा लोकशाहीचा उत्सव आहे. सुदृढ लोकशाहीसाठी मतदानाचा हक्क बजावणे अत्यंत आवश्यक असून हे आपले कर्तव्य असल्याची भावना नागरिकांमध्ये असल्याची उदाहरणे दिसून येतात.

असेच उदाहरण परळी येथे घडले असून घरातील आजीचे निधन झाल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळलेला असतानाही परळीतील प्रयाग कुटुंबियांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला आहे.

परळी वैजनाथ येथील मोंढा भागातील व्यापारी हरीश व गिरीश प्रयाग यांच्या आजी कावेरीबाई रंगनाथराव प्रयाग यांचे मतदान दिनाच्या आदल्या दिवशी ( दि.१९) वृद्धापकाळाने निधन झाले. कावेरीबाई रंगनाथराव प्रयाग या अतिशय कुटुंबवत्सल, धार्मिक, मनमिळावू व प्रयाग कुटुंबाच्या आधारवड म्हणून परिचित होत्या. वृद्धापकाळाने त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, नातवंड,पतवंड असा परिवार आहे. सुधीर रंगनाथराव प्रयाग यांच्या त्या आई होत. त्यांच्या पार्थिवावर आज ( दि. २०) परळी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

दरम्यान, आज मतदान प्रक्रिया सुरू असताना प्रयाग कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. मात्र, आजीच्या निधनाचे दुःख असतानाही संपूर्ण प्रयाग कुटुंबाने मतदान करून आपले राष्ट्रीय कर्तव्य बजावले. सकाळी आजीवर अंत्यसंस्कार करून दुःखद अंतकरणाने का होईना परंतु आपल्या संबंधित मतदान केंद्रावर जात संपूर्ण प्रयाग कुटुंबाने मतदानाचा हक्क बजावला.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE